## पान १ वरून

# शरद पवार भ्रष्टाचाराचे सरदार – शाह

विचारला आणि महाराष्ट्रात पुन्हा सत्तेत आणण्याचे आवाहन केले. तीन निवडणुकांतील पराभवानंतर गांधींचा अहंकार वाढलाकाँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर अमित शाह यांनी जोरदार टीका केली. शाह म्हणाले की, आम्ही कलम ३७० हटवून दाखवले. भारतीय जनता पक्ष हा विचारधारेवर चालतो. आम्ही जी वचने दिली ती पूर्ण केली आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत केली आहे. परंतु, ज्याला केवळ ३० टक्के मार्क मिळाले, तो अहंकारी बनला आहे, असे म्हणत लोकसभेचे विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांच्यावर टीका केली. विशेष म्हणजे तीन निवडणुकांत पराभूत झाल्यानंतरही राहुल गांधी यांचा अहंकार प्रचंड वाढला आहे.

**विधानसभेत कसर भरून काढा**

आपण जिंकूनही निराश असल्यासारखे वाटतेय आणि दुसरीकडे पराभवानंतरही राहुल गांधी अहंकारी झालेत. भाजपला २४० आणि एनडीएला ३०० जागा मिळाल्या आहेत. हे लक्षात ठेवा. निवडणुकीत लोकांनी मोदींच्या दहा वर्षांच्या कामकाजावर मोहोर उमटवली. तरी देखील बहुमत मिळाले नाही, याची खंत वाटतेय. पण डोके धरून बसू नका. आता विधानसभेत सगळी कसर भरून काढा. हताश होऊ नका. लोकसभेतील मोठा विजय आहे. महाराष्ट्रातही २०२४ मध्ये सर्वात मोठा विजय होणार आहे, असा दावा अमित शाहांनी यांनी यावेळी केला.

**गैरसमज करून घेण्याची गरज नाही**

कार्यकर्त्यांमध्ये थोडेसे कन्फ्युजन होताना दिसून येत आहे, परंतु कसलाही गैरसमज करून घेण्याची गरज नाही. त्यासाठी एक उदाहरण देतो, दोन मुले आहेत. एकाच वर्गात शिकत होते. एक ८० टक्के घेऊन वर्गात नंबर एकवर येत होता, तर दुसऱ्या वेळेस त्याने ९० टक्के घेण्याचा संकल्प केला. जो दुसरा विद्यार्थी होता तो चार वर्षांत त्याच वर्गात होता. त्याला २० मार्क पडायचे. यावेळी त्याने २५ मार्कांची अपेक्षा ठेवली होती. निकाल आला तेव्हा ८० टक्केवाल्या विद्यार्थ्याला ७५ मार्क मिळाले आणि २० वाल्याला २५ मार्क मिळाले. असाच प्रकार आपल्या बाबतीत घडला आहे.

**मराठा समाजाला भाजपच आरक्षण देणार**

अमित शाह पुढे म्हणाले की, पवार साहेबांना आज सांगतो की, जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात भाजप सरकार येते, तेव्हा मराठ्यांना आरक्षण मिळते. जेव्हा सरकार जाते, तेव्हा मराठा आरक्षण गायब होते. २०१४ मध्ये मराठा आरक्षण लागू केले, तेव्हा भाजपचे सरकार होते. तेव्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते. मधल्या काळात शरद पवारांचे सरकार होते, मराठा आरक्षण गायब झाले. आता पुन्हा आमचे सरकार आले, आम्ही मराठा आरक्षण दिले आहे. मराठा आरक्षण कायम ठेवायचे असेल, तर भाजपचेच सरकार पाहिजे. मराठ्यांना आरक्षण देण्याचे काम केवळ भाजपने केले आहे, असे अमित शाह म्हणाले.

**एक ग्रॅमदेखील दूध पावडर आयात केली जाणार नाही**

अमित शाह यावेळी म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकाचा विकास करण्याचे काम भारतीय जनता पक्षाने केले आहे. खोटे कसे पसरवले जात आहे, सध्या एक नोटिफिकेशन काढले आहे, तारीख नवीन आहे, निर्णय जुनाच आहे. मीदेखील चकित झालो. मी पियूष गोयल यांना फोन केला, त्यांनी सांगितले, हा निर्णय आपला नाही, शरद पवार यांचा आहे. दुधाची पावडर आयात करण्याचे सर्क्युलर ते (शरद पवार) काढून गेले आहेत, पण मोदी सरकारने दहा वर्षांत एक किलो देखील दूध पावडर आयात केली नाही आणि पुढील पाच वर्षांतदेखील एक ग्रॅमही दूध पावडर आयात केली जाणार नाही. हे भ्रम पसरवून निवडणूक जिंकू इच्छित आहेत, असेही अमित शाह म्हणाले.

**डंके की चोट पर सांगतो शरद पवार भ्रष्टाचारांचे सरदार**

हे भ्रष्टाचारावर बोलत आहेत, भ्रष्टाचाराचा सर्वांत मोठा सरदार भारताच्या राजकारणात कोण असेल तर ते शरद पवार आहेत, याबद्दल माझ्या मनात कसलीच शंका नाही. तुम्ही आमच्यावर काय आरोप करताय? देशातील कोणत्याही सरकारच्या काळात भ्रष्टाचाराला संस्थात्मक पद्धतीने करण्याचे काम कोणी केले असेल तर ते शरद पवार तुम्ही केले आहे. मी 'डंके की चोट'पर हे सांगतो. तुम्ही आमच्यावर आरोप करत आहात. तुमचे खोटे इथे चालणार नाही, घरोघरी जाऊन या खोट्याबद्दल माहिती द्यायची आहे, असेही शाह यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.

**दहा वर्षांत महाराष्ट्राला काय दिले? :** ते महाराष्ट्राच्या विकासावर बोलत आहेत, आज मी शरद पवार यांना विचारतो, दहा वर्षे महाराष्ट्रात तुमचे सरकार होते. केंद्रात देखील तुमचे सरकार होते, तुम्ही महाराष्ट्राला काय दिले? हिशेब द्या? खोट्या आश्वासनाशिवाय काही दिले नाही. यूपीए सरकारच्या काळात महाराष्ट्राला फक्त एक लाख ९१ हजार कोटी मिळाले होते. नरेंद्र मोदींनी दहा वर्षांत १० लाख पाच हजार कोटी रुपये महाराष्ट्राला दिले आहेत. पवार साहेब, हिशेबावर विश्वास नसेल तर पुण्यातील कोणताही चौक निवडा आमचे मुरलीधर मोहोळ हिशेब घेऊन उभे राहतील, असेही अमित शाह येथे म्हणाले. त्यांनी पुणे, मुंबई, नाशिक, नागपूरसाठी काही केले नाही. या चार शहरांचा विकास मोदी सरकारने केला, असेही शाह म्हणाले.

**पुढील सरकार भाजपच्या नेतृत्वात :** राजीव गांधी यांनी आपल्यावर टीका करताना म्हटले होते, हम दो हमारे दो... परंतु गत १० वर्षे आणि यंदाची पाच वर्षे अशी १५ वर्षे देशात भाजपच्या नेतृत्वाखालचे सरकार आहे. १० वर्षांच्या कार्यकाळानंतर अजिबातही सरकारविरोधी लाटेचा फटका आपल्याला बसला नाही. त्यामुळे लोकसभेतील आपले यश छोटे मानता येणार नाही, असे सांगत कार्यकर्त्यांच्या निराश मनाला अमित शाह यांनी उभारी देण्याचा प्रयत्न केला. तसेच महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांनंतर भाजपच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार असेल, असे सांगताना मुख्यमंत्रीही भाजपचाच असेल, असे अप्रत्यक्षपणे संकेत त्यांनी दिले. माझ्या बोलण्याचा नीट अर्थ समजून घ्या, असे आवर्जून सांगत भाजप कार्यकर्त्यांना अधिक मेहनतीचा सल्ला दिला.

# अर्थमंत्री सीतारामन उद्या सादर करणार सातवा अर्थसंकल्प

त्या मोडून काढतील. या वर्षी दोन अर्थसंकल्प सादर होणार आहेत. यातील एक अंतरिम अर्थसंकल्प सादर झाला असून, आता २३ जुलै रोजी पूर्ण अर्थसंकल्प सादर होईल. याचे कारण म्हणजे सत्ताधारी सरकार सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी पूर्ण अर्थसंकल्प सादर करू शकत नाही. गेल्या महिन्यात पुन्हा निवडून आल्यानंतर २३ जुलै रोजी सादर होणारे भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचे पहिले बजेट असेल.

अर्थसंकल्पाशी संबंधित काही रोचक तथ्ये - २६ नोव्हेंबर १९४७ रोजी देशाचे पहिले अर्थमंत्री आर. के षण्मुखम चेट्टी यांनी स्वतंत्र भारताचा पहिला सामान्य अर्थसंकल्प सादर केला होता.

▮ माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि नंतर पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्यकाळात अर्थमंत्री म्हणून एकूण १० अर्थसंकल्प सादर केले आहेत.

▮ माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी ९ वेळा अर्थसंकल्प सादर केला.

▮ प्रणव मुखर्जी यांनी अर्थमंत्री असताना ८ अर्थसंकल्प सादर केले.

▮ माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी पी. व्ही. नरसिंह राव सरकारमध्ये अर्थमंत्री असताना १९९१ ते १९९५ दरम्यान सलग पाच वेळा अर्थसंकल्प सादर केला.

▮ सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२० रोजी २ तास ४० मिनिटांचे सर्वात मोठे अर्थसंकल्पीय भाषण दिले. हिरुभाई मुलजीभाई पटेल यांचे १९४७ मधील अंतरिम अर्थसंकल्पीय भाषण हे आतापर्यंतचे सर्वात लहान भाषण आहे, ज्यामध्ये केवळ ८०० शब्द होते.

# ते 'डर्टी डझन' नेते तुमच्याच सोबत – सुप्रिया सुळे

भाजपमध्ये पदाधिकारी आहेत किंवा राज्यात मंत्री आहेत. अमित शाहांची पवारांवरील टीका ही हास्यास्पद आहे. ज्यांच्यावर भाजपने भ्रष्टाचाराचे आरोप केले ते अशोक चव्हाण हे तर आज मंचावर शाहांच्या मागे बसले होते. देवेंद्र फडणवीस यांनी तर 'चक्की पिसिंग' ही लाईन धरली होती, त्याचे काय झाले. आरएसएसने कृषी मंत्रालयाबाबत ११८ कोटींचे आरोप केले, त्यावर तुम्ही काहीच का बोलत नाही, असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी अमित शाहांना केला.

# कोणाचं कोणावाचून अडत नाही – अजित पवार

आहेत. यंदा जे बजेट दिले आहे ते विकास आणि व्हिजनचे ऐतिहासिक बजेट आहे. याद्वारे अनेक योजना आणल्या आहेत. पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी फक्त विकासाची भाषा लक्षात ठेवावी. जनतेची सेवा आणि संवाद हाच नरेटिव्ह आहे. वरिष्ठांच्या सूचना पाळाव्या आणि त्याच पद्धतीने काम करावे.

मी साहेबांचा अपमान केला नाही : डीपीडीसी बैठकीमध्ये करण्यात आलेल्या आरोपांवर पवार यांनी स्पष्टीकरण दिले. डीपीडीसी बैठकीमध्ये कोण किती वेळ बोलले आणि अजित पवार यांनी किती ऐकलं याचा रेकॉर्ड आहे. पण उगाच सहानुभूती घेण्यासाठी काहीजण म्हणतात की, मी साहेबांना बोलू दिले नाही. मी भेदभाव करणारा नेता नाही, विरोधकांना पण माहिती आहे, काल काही गोष्टी घडल्या, अडीच तास मीटिंग झाली. सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे यांच्यासह अनेकजण होते. सुप्रिया सुळे म्हणाल्या की मावळमध्ये जास्त निधी दिला. यावर शेळके यांनी म्हटले की, तुम्ही सारखा हा उल्लेख करताहात. कुणाला दुखवायचं नाही. मी साहेबांचा अपमान केला नाही, हा आरोप म्हणजे नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न आहे, असे अजित पवार म्हणाले.

# संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून

विरोधकांमध्ये चांगलीच खडाजंगी होऊ शकते. याशिवाय सरकारमधील सहभागी पक्ष जदयुने बिहारला विशेष दर्जा देण्याची मागणी केल्याने मोदी सरकार अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर लोकसभेच्या उपाध्यक्ष पदासाठी काँग्रेस आग्रही असल्याने सरकार काय भूमिका घेईल, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# गगनबावडा, रत्नागिरी मार्ग बंद

इशारा पातळीकडे वाटचाल करत आहे. इशारा पातळी ३९ फूट इतकी आहे, तर पंचगंगेची धोका पातळी ४३ फूट इतकी आहे. जिल्ह्यातील एकूण ८५ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. यामुळे अनेक ठिकाणी रस्ते वाहतुकीसाठी बंद झाले आहेत. दरम्यान पावसाचा जोर असाच कायम राहिला तर पंचगंगा धोक्याची इशारा पातळी गाठेल असा अंदाज प्रशासनाकडून वर्तवण्यात येत आहे. जिल्हा आपत्ती विभागाकडून नागरिकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना केल्या असून, नदीकाठावरील गावे, तसेच नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. दरम्यान, राधानगरी धरण सुमारे ८० टक्के भरले आहे.

राधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात रविवारी पहाटेपासून होणाऱ्या धुवाधार अतिवृष्टीमुळे दुपारी ४ वाजता राधानगरी धरण ७९.५७ टक्के म्हणजे जवळपास ८० टक्के भरले आहे. रविवारी पहाटे ६ वाजता राधानगरी धरणाची पाणीपातळी ३३६.४१ होती, तर धरण ७६.६१ टक्के इतके भरले होते. पहाटे सहापासून दहा तास झालेल्या दमदार पावसामुळे रविवारी सायंकाळी ४ वाजता पाणीपातळी ३३७.८० वर पोचली, तर धरण ७९.५७ टक्के एवढे भरले आहे.

दिवसभर झालेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्याला महापुराचा धोका वाढू लागला आहे. धरण क्षेत्रासह संपूर्ण जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस सुरू आहे. परिणामी, धरणांसह नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊ लागली आहे. पंचगंगा नदीवरील पाणीपातळी इशारा पातळीच्या दिशेने जाऊ लागली आहे. राजाराम बंधाऱ्यातून प्रतिसेकंद ४३,८२२ क्युसेक विसर्ग सुरू झाल्याने तब्बल ८६ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.कोल्हापुर व सांगली जिल्ह्याला जोडणारा वारणा नदीवरील निलेवाडी-ऐतवडे खुर्द पुल पुराच्या पाण्याखाली गेला असून रविवारी रात्री उशिरा वडगांव पोलिसांकडून बॅरेकॅड्स लावून सदर पुलावरील रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आली आहे. गेले काही दिवस चांदोली-वारणा धरण पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे वारणा नदीला पूर आला असून निलेवाडी-ऐतवडे खुर्द हा पूल रविवारी सायंकाळी उशिरा पाण्याखाली गेला आहे. या दरम्यान पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन अलर्टवर आहे.

**शाहूवाडीत सर्वाधिक पाऊस**

आज सकाळी ८ वाजता संपलेल्या चोवीस तासांत जिल्ह्यात २८.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये सर्वाधिक ५८.४ मिमी पाऊस शाहूवाडी तालुक्यात झाला आहे. तालुकानिहाय पावसाची (कंसात मिमी) नोंद अशी, हातकणंगले (१५.१६), शिरोळ (७.१), पन्हाळा (२९.१), शाहूवाडी (५८.४), राधानगरी (२९.४), गगनबावडा (३५.६), करवीर (२१.८), कागल (२४.७), गडहिंग्लज (२५.६), भुदरगड (४१.४), आजरा (४२.२) व चंदगड (३६.२).

* नदीकाठची पिके पाण्याखाली..

पावलाचा जोर वाढल्याने नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. अनेक नद्या सलग तिसऱ्यांदा पात्राबाहेर पडल्या आहेत. धरण क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. राधानगरी धरणातून प्रतिसेकंद १४५० क्युसेक, तर वारणा धरणांतून १५९२ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदीकाठची पिके पाण्याखाली गेली आहेत.


ऑफर घरा घरात... मना मनात... पुण्यनगरी ऑफर

APPOINTMENT

ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.

आता सवलतीच्या दरात

| | |
|---|---|
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ५०००/- |
| मुंबईसह कोकण विभाग | रु. ५०००/- |
| उत्तर महाराष्ट्र | रु. ५०००/- |
| मराठवाडा विभाग | रु. ५०००/- |
| विदर्भ | रु. ५०००/- |
| कोणतेही दोन विभाग | रु. ७५००/- |
| कोणतेही तीन विभाग | रु. ११५००/- |
| कोणतेही चार विभाग | रु. १५५००/- |
| संपुर्ण महाराष्ट्र | रु. १९५००/- |

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२३ पासून लागू. | स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा 18002081019

E-mail:customercare@sapp.in


## दैनिक राशी भविष्य

सौ. स्वप्ना अवसरे-पवार

सातारा. मोबाईल : ९८२२३०३०५४

**मेष :** मनोबल उत्तम असणार आहे. आज तुम्ही तुमचे विचार स्पष्टपणारे मांडणार आहात. आत्मविश्वासपूर्वक कामे पूर्ण करणार आहात. तुमचा इतरांवर प्रभाव पडणार आहे. प्रवास सुखकर होणार आहेत.

**वृषभ :** मानसिक उद्विग्नता संपेल. उत्साही राहाल. आशावादीपणाने कार्यरत राहाल. आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमचे मनोबल व आत्मविश्वास वाढणार आहे. कामाचा ताण कमी होईल.

**मिथुन :** मनोबल कमी असणार आहे. प्रवास शक्यतो आज नकोत. कामामध्ये लक्ष लागणार नाही. आज तुम्हाला एखादी चिंता लागून राहण्याची शक्यता आहे. वाहने जपून चालवावीत.

**कर्क :** आज तुमचे मनोबल व आत्मविश्वास वाढणार आहे. कामाचा ताण कमी करू शकणार आहात. गेले दोन दिवस रखडलेली कामे पूर्ण करू शकणार आहात. उत्साहाने कार्यरत राहाल.

**सिंह :** आज एखादी मनाविरुद्ध घटना संभवते. शांत राहावे. काहींना अनावश्यक कामे करावी लागणार आहेत व त्यामुळे तुमची चिडचिड होणार आहे. प्रवास आज नकोत. अकारण वेळ वाया जाईल.

**कन्या :** आज तुम्ही तुमच्या मुला-मुलींच्या प्रगतीकडे विशेष लक्ष देणार आहात. मानसिक प्रसन्नता राहील. काहीजण आज एखादा महत्त्वाचा निर्णय घेणार आहेत. तुमचे बौद्धिक परिवर्तन होणार आहे.

**तुळ :** आज तुम्ही अत्यंत आनंदी व आशावादी राहणार आहात. मानसिक प्रसन्नता देणारी एखादी घटना घडेल. तुम्ही आपली मते इतरांना पटवून देणार आहात. तुमचा प्रभाव वाढणार आहे.

**वृश्चिक :** जिद्दीने व चिकाटीने कार्यरत राहणार आहात. आज तुमचे मनोबल अपूर्व असणार आहे. कामाचा ताण कमी होईल. प्रवासात काळजी घ्यावी. तुम्ही आपली मते इतरांवर लादण्याचा प्रयत्न कराल.

**धनु :** उत्साही राहणार आहात. कुटुंबातील व्यक्तींचे सहकार्य लाभेल. सुसंवाद राहील. काहींना एखादी गुप्तवार्ता समजेल. तुमचे मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल.

**मकर :** आज तुमचा उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. प्रवास सुखकर होतील. मनोबल उत्तम असल्याने दैनंदिन कामे विनासायास पूर्ण होणार आहेत. आरोग्य उत्तम राहील.

**कुंभ :** आज आपणाला विनाकारण एखादा मनस्ताप संभवतो. आरोग्याच्या किरकोळ तक्रारी राहतील. दैनंदिन कामे रखडण्याची शक्यता आहे. तुमचे मनोबल कमी राहणार आहे. काहींना नैराश्य जाणवेल.

**मीन :** काहींना अचानक धनलाभ होणार आहेत. जुन्या आठवणींमध्ये रमणार आहात. मित्र-मैत्रिणी व सहकारी यांचे उत्तम सहकार्य लाभेल. प्रवास सुखकर होणार आहेत. मानसिक प्रसन्नता लाभेल.


घरा घरात... मना मनात... पुण्यनगरी

जाहीर प्रगटन

आता फक्त 600/- रुपयात

– संपर्क –

मो. 8888836822

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल.



ICICI Home Finance

**कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी–कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०५९, भारत

**शाखा कार्यालय :** पहिला मजला, कार्यालय क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र.–२९, उपभूखंड क्र.–१, राडिका रोड, कारंजे तर्फ, सातारा–४१५ ००२

**(नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा)**

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना**

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई–लिलाव विक्रीकरिता सूचना

याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत, तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री ''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास | येणे असलेली रक्कम | राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव | मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| (ए) | (बी) | (सी) | (डी) | (ई) | (एफ) | (जी) |
| १ | कुणाल सेवकचंद लकेरी (कर्जदार), किशोरी सेवकचंद लकेरी (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएसआरए ००००१३३३१९३ व एलएचएसआरए ००००१३३३१८९ | फ्लॅट क्र. ए–८, दुसरा मजला, ''श्री गणराया'' नावाने ज्ञात इमारतीतील, आर. एस. नं. १५, प्लॉट क्र. १, जकातवाडी, तालुका व जिल्हा सातारा | रु. १६,२१,५४३/– दि. १६ जुलै २०२४ | रु. १७,६९,२८३/– / रु. १,७६,९३०/– | २९ जुलै २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.०० | ०९ ऑगस्ट २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.०० |

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोब टेक** यांचे संकेतस्थळ **(यूआरएल लिंक – https://BestAuctionDeal.com)** यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार/सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क **दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० पर्यंत** अदा करावे, त्यास ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी इसारा रक्कम ठेव (ईएमडी) आरटीजीएस/डिमांड ड्राफ्ट (डीडी) यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, पहिला मजला, कार्यालय क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र.–२९, उपभूखंड क्र.–१, राडिका रोड, कारंजे तर्फ, सातारा–४१५ ००२** येथे **०८ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, पहिला मजला, कार्यालय क्र. २३, २४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र.–२९, उपभूखंड क्र.–१, राडिका रोड, कारंजे तर्फ, सातारा–४१५ ००२** येथे **०८ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डीडी हा राष्ट्रीयीकृत बँकेचा/शेड्युल्ड बँकेचा आणि **''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड–लिलाव''** यांच्या नावे आणि **सातारा** येथे देय असावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी, तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड– ९९२०८०७३००** किंवा आमचे **विक्री आणि विपणन भागीदार नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/येथे भेट द्यावी.

**दिनांक : २२ जुलै २०२४**


**स्थळ : सातारा**

**प्राधिकृत अधिकारी**

**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

**सीआयएन नंबर : U65922MH1999PLC120106**


## शब्दनगरी



**आडवी विधाने :**

१. अजय देवगण, तब्बू, डॅनी यांचा चित्रपट
५. 'निकोबार'च्या बाजूचे बेट
९. मनुष्य, माणूस
१०. भारताचे दक्षिणेकडील टोक
११. हळू, जड, आळशी; निस्तेज
१२. नटणारा
१४. चविष्ट, रुचकर
१९. डोके, मस्तक
२०. शाहरूख खान, माधुरी दीक्षित, दीपक तिजोरी यांचा चित्रपट
२१. जॉन अब्राहम, अक्षयकुमार यांचा चित्रपट
२५. कलाबतू
२६. राज कपूर, नर्गिस यांचा चित्रपट
२७. मार्ग, रस्ता, सडक
२८. सूर्य (हिंदी); राजेंद्रकुमारचा चित्रपट
२९. साथीच्या रोगातून टोचतात ते औषध
३१. कपी, माकड
३२. संजय दत्त, पूजा भट्ट, सदाशिव अमरापूरकर यांचा चित्रपट
३३. धाक, दरारा
३५. बाष्फ, पाण्याचे वायुरूप
३६. पवन, हवा, वात
३७. शोध, थांग
३९. 'स्वर्ग'च्या विरुद्ध शब्द
४१. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोझ खान यांचा चित्रपट
४३. मिथुन चक्रवर्ती, रंजिता, शरद सक्सेना यांचा चित्रपट
४५. वनात राहणारा वा वावरणारा
४७. बाप, पिता, जन्मदाता
४९. ढीग, खच, सडा
५१. हस्त, हात
५२. तपाने लाभलेली अलौकिक शक्ती
५३. राजेश खन्ना, झीनत अमान यांचा चित्रपट
५४. एक म्हण - ** तशी माती

**उभी विधाने :**

१. हवाईजहाज
२. लोक, प्रजा
३. मुसलमान
४. ग्लानी, मरगळ
५. हत्तीला ताब्यात ठेवण्याचे एक साधन
६. एक श्वासरोग
७. सीतामाईला भुरळ घालणारा एक मायावी राक्षस
८. पोट, कोठा
११. पांढऱ्या रुईचे झाड
१३. एक हजार किलोचे माप
१५. शिफारस, ओळख
१६. दुखणे, व्याधी
१७. वडिलोपार्जित संपत्तीवरील हक्क
१८. बर्फ
२०. हनुमानाची आई
२१. एक म्हण - *** सरो वैद्य मरो
२२. अर्थ (हिंदी)
२३. एक टिकाऊ इमारती लाकूड
२४. बारीकसारीक, किडुकमिडुक
२६. प्राप्ती, भरभराट
२७. कमतरता, उणीव
२८. वचपा, बदला
३०. घर, धाम
३२. सोन्या-चांदीचा व्यवहार करणारा
३३. विजयादशमी
३४. पायविहीर
३६. तड, फैसला, अखेर
३८. पाप, कुकर्म
४०. सोने, सुवर्ण
४२. मुसलमानी वर्षाचा सातवा महिना
४४. खिन्न, निराश, उदास
४६. सूत कातण्याचा रहाट
४८. एक पौराणिक प्रेमीयुगुल - ** दमयंती
५०. वर्ष, साल

### कालचे शब्दनगरीचे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कु | तू | ब | मि | ना | र | | ह | वा | ल | दि | ल |
| बे | ट | | ला | व | स | ट | | ता | ग | | ल |
| र | | स | फ | र | | व | रा | ह | | फि | का |
| | ही | रो | | स | मे | ट | | त | प | की | र |
| प | र | व | ड | | र | वी | ना | | द | र | |
| रि | | र | हा | ट | | त | क | दी | र | | क |
| चा | ल | | ळी | | बि | | तो | | मो | स | म |
| रि | वा | ज | | रा | ज | वा | डा | | ड | का | र |
| का | ज | ल | | वा | व | र | | त | | ळ | |
| | मा | स | ला | | र | स | न | गा | र | | सा |
| ता | | मा | च | वा | | दा | | दा | स | बो | ध |
| स | मा | धी | | म | हि | र | प | | द | | ना |